अपंग, महिला-बाल विकास संस्था, नागपूर

स्थापना : ३ जुलै १९९३ ● रजि. नं. महा/४१३/९३

आत्म दीपो भव !

आशादीप

संस्थापिका
स्व. उषाताई संत

# आशादीप

ई-नियतकालिक
जानेवारी–जून २०२४



E-mail : pnslit@yahoo.com

Website : www.ashadeepsanstha.org.in
youtube channel : ashadeepsanstha

प्लॉट नं. १, सिव्हिल लाईन्स, वेस्ट हायकोर्ट रोड, नागपूर-४४० ००१ दूरध्वनी : ०७१२-२५४५४७७ मो. ९८२३३ ६२१६१, ९४२१२१२४४८


## दृष्टीबाधित व्यक्तिंसाठी डिजिटल टेक्नॉलॉजी मार्गदर्शन कार्यशाळा

**दि. ३ फेब्रुवारी २०२४**








आशादीप दिव्यांग प्रेरणा केंद्र, अपंग, महिला, बाल विकास संस्था आणि आंबेडकर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दृष्टीबाधित व्यक्तिसाठी डिजिटल टेक्नॉलॉजी बद्दल माहिती व मार्गदर्शन करण्यासाठी नागपूर येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यासाठी Tech Assistant For Blind या संस्थेचे श्री. अजय साळवे, श्री. जीतू राज व श्री. इमरान शेख या दृष्टीबाधित मार्गदर्शकांनी दृष्टीबाधित विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. मोबाईल वर दृष्टीबाधित व्यक्तीला उपयुक्त Apps देऊन, त्यांचा उपयोग, त्यासाठी योग्य मोबाईल कसा निवडावा, इ. माहिती दिली. या बरोबरच गूगल अकाउंट सुरु करणे आणि त्याची उपयोगिता, Text to Speech, PDF to Speech, आणि Speech to Text या सुविधा, चलनी नोटांची ओळख पटविणारे RBI money app, तसेच दृष्टीबाधित व्यक्तींना कधीही कुठेही मदत देणाऱ्या Be my eyes या app, बद्दल सविस्तर माहिती दृष्टीबाधित व्यक्तींबरोबरच डोळस व्यक्तींना देखील नवी दृष्टी देणारी होती. अनेक माहितीपर video, audio books, शासकीय परिपत्रके, इ. www.techassitantforblind.com या वेब साइटच्या माध्यमातून उपलब्ध आहेत हे त्यांनी सांगितले.

''डिजिटल टेक्नॉलॉजी'' च्या मदतीने ग्रामीण भागातील उत्पादनाला दलालांच्या मध्यस्थी शिवाय देशभरात व्यवसाय करता येतो आणि या सुविधेचा दृष्टीबाधित व्यक्ति देखील लाभ घेऊ शकतील, अशी कार्यशाळेच्या उद्‌घाटक श्रीमती प्रगती गोखले यांनी माहिती दिली.

'डिजिटल टेक्नॉलॉजी महाकाय हत्ती सारखी असून त्याचे विविध पैलू आपल्या समक्ष येत आहेत, त्याचा आपण योग्य उपयोग करावा आणि यशस्वी व्हावे' असे आशादीपच्या अध्यक्ष डॉ. प्रतिमा शास्त्री म्हणाल्या. तत्पूर्वी आंबेडकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मेहेरे यांनी कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत महाविद्यालयाने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्थापन केलेल्या 'संवेदना सेल'ची माहिती दिली आणि कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. श्री. अजय साळवे यांनी Tech. Assistant For Blind या संस्थेच्या online उपक्रमांची थोडक्यात माहिती दिली. प्रा. रोहिणी मेश्राम यांनी कार्यक्रमाचे संचलन केले. या कार्यक्रमाला दृष्टीबाधित विद्यार्थी, मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंबेडकर महाविद्यालय आणि 'आशादीप' च्या सदस्यांचे उत्तम सहकार्य होते.





# संपादकीय

आषाढघन बरसू लागले, आणि वातावरणात हिरवळीचे हास्य फुलू लागले आहे. तसेच या वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त प्रकाशित होत असलेले हे इ-मॅगझिन आशादीपच्या अनेक उपक्रमांची माहिती घेवून आपल्यासमोर येत आहे. कार्यकर्त्यांना नव्या उत्साहाने, नव्या जोमाने कार्य करण्याची प्रेरणा या विविध उपक्रमांच्या यशस्वितेतून मिळत असते. तंत्रज्ञान ही जणू आजच्या आधुनिक युगात मूलभूत गरज होऊ पाहत आहे. त्यामुळे संस्थेचे दिव्यांग स्नेहीमंडळ सदस्य यात कुठेही मागे पडता कामा नये या उद्देशाने संस्थेने यंदा दोन मोठ्या तंत्रज्ञान विषयक कार्यशाळांचे आयोजन केले. दिव्यांगांना तंत्रज्ञानस्नेही बनण्यास या कार्यशाळा उपयुक्त ठरल्या. दिव्यांगाच्या सक्षमीकरणाच्या आयामांची माहिती देणारी व्याख्यानमाला हे यंदाचे वैशिष्ट्य!

जीवन शिक्षण विविध माध्यमातून होत असते त्यात सहलीचा फार मोठा वाटा असतो. आनंद, अनुभव व ज्ञानवर्धन व्हावे यादृष्टीने आशादीप सहलीचे आयोजन करीत असते. अशा चांगल्या उपक्रमांसाठी प्रायोजक सहर्ष पुढे येत असतात. त्यांच्या स्नेह सहकार्यातून संस्था असे उपक्रम राबवू शकते. विद्यार्थी त्याची आतुरतेने वाट बघत असतात.

श्रीकांत बोल्ला या यशस्वी अंध दिव्यांग उद्योजकाच्या जीवनावर आधारित चित्रपट 'श्रीकांत' स्नेहीमंडळ सदस्यांना दाखविण्यात आला. सर्वांच्या बोलक्या उत्साहवर्धक प्रतिसादाने एक वेगळीच अनुभूती लाभली. शिवाय मुलांनी प्रेरणा मिळाल्याचेही नमूद केले.

महिला दिनानिमित्त या वर्षापासून सुरुवात केलेल्या स्व. गौरी शिरखेडकर पुरस्काराने प्रथम अंध महिला नोटरी ॲडव्होकेट नंदिता त्रिपाठी यांचा सत्कार म्हणजे संस्थेच्या युवतींसाठी प्रेरणा मंचच ठरला.

सक्षम महानगर नागपूरच्या अधिवेशनात आशादीपच्या 'पुढे पुढे जाणार' या निर्धार गीताने वाहवा मिळवली, तसेच स्नेही मंडळातील मसाज थेरपिस्ट व उद्योजकांनी सहभाग घेतला.

दिव्यांगांच्या आत्मनिर्भरतेसाठी फिनाईल, डिटर्जंट तयार करण्यासाठीची कार्यशाळा घेण्यात आली, त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यातून मुलांची शिकण्याची धडपड जाणवली.

पोषक आहाराचे महत्व समाजात, विशेषतः महाविद्यालयीन युवकांमध्ये रुजविण्यासाठी संस्था आहार जागर कार्यक्रम घेत असते.

आशादीपच्या कार्याचा गंध दिव्यांगांच्या मनात कायम दरवळत रहावा यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य असेच लाभत राहील हा विश्वास आहे.

**या नभाने या भुईला दान द्यावे**
**आणि या मातीतून चैतन्य गावे....**

**- सौ. अपर्णा अजय कुळकर्णी**
सचिव

# कार्यकारिणी मंडळ

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष<br>**डॉ. प्रतिमा शास्त्री**<br>९८२३३६२१६१ | उपाध्यक्ष<br>**श्रीमती वनिता पाटील**<br>९२२५२६३५७९ | उपाध्यक्ष<br>**श्रीमती छाया तारे**<br>९७३०२७८२०४ |
| सचिव<br>**श्रीमती अपर्णा कुळकर्णी**<br>९४२१२१२४४८ | सहसचिव<br>**श्रीमती रेखा पारखी**<br>९८५०६१७६१४ | सहसचिव<br>**श्रीमती शर्मिला केकतपुरे**<br>९४२२१४६२०८ |
| कोषाध्यक्ष<br>**डॉ. नुतन देव**<br>७७९८४१४२१५ | सहकोषाध्यक्ष<br>**डॉ. अनघा नासेरी**<br>९८२३४२४२७१ | सदस्य<br>**डॉ. निवेदिता कुळकर्णी**<br>९४०३११६६२८ |
| सदस्य<br>**श्रीमती अलका शेष**<br>९९२३१४२३३४ | सदस्य<br>**डॉ. जयश्री पंढरपूरकर**<br>९८९००५९६९३ | सदस्य<br>**श्रीमती आरती संत**<br>९७६६७३९३८५ |
| सदस्य<br>**श्रीमती शैलजा काळे**<br>९४२३०३९९१२ | सदस्य<br>**डॉ. वृंदा जोगळेकर**<br>९४२२११३९४१ | सदस्य<br>**श्रीमती गीता तारे**<br>९४२३७६२७३२ |

# हितचिंतक व सल्लागार

| | | |
|---|---|---|
| श्री एल. बी. पाटील | श्री पराग पांढरीपांडे | डॉ. प्रभा बल्लाळ |
| श्री प्रकाश शेष | श्री वि. श्री. नासेरी | डॉ. प्रकाश देव |
| डॉ. रेणुका माइंदे | डॉ. मधुकर भोतमांगे | श्री प्रदीप संत |

# संपादकीय मंडळ

प्रमुख संपादक
**डॉ. प्रतिमा शास्त्री**

कार्यकारी संपादक
**डॉ. अनघा नासेरी**

| | | |
|---|---|---|
| सौ. अपर्णा कुळकर्णी | श्रीमती छाया तारे | डॉ. सीमा उबाळे |
| डॉ. वृंदा जोगळेकर | श्रीमती विद्या करपटे | डॉ. नूतन देव |

# अभिनंदन

१) **ईश्वरी पांडे -** दिव्यांग दृष्टीबाधित जलतरण पटू - एशियन बुक ऑफ रेकॉर्डस् मध्ये अरबी समुद्रात विक्रमी झेप. समुद्र दुरी ४ तास ३ मी. पार केली.

२) **सुवर्णा राज -** भारत निर्वाचन आयोग ब्रॅन्ड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्त दि. १० ते १४ जून २०२४ रोजी १७व्या संयुक्त राष्ट्र संघ राज्य पक्षाच्या UNCRPD - COSPIT (अपंग व्यक्तिंचे संयुक्त राष्ट्र अधिवेशन हक्क - राज्य पक्षाची परिषद) आणि सिव्हील सोसायटी फोरम येथे वक्ता म्हणून भारताचे प्रतिनिधी केले. यू.एन. मुख्यालय न्युयॉर्क याशिवाय अनेक क्रिडा स्पर्धामध्ये सहभाग आणि पारितोषिक.

३) **दीपस्तंभ फाऊंडेशन -** मनोबल सन्मानित मा. दीनानाथ मंगेशकर स्मृति प्रतिष्ठानातर्फे समाजसेवेसाठी पुरस्कार दिला.

४) **श्रेयस बहादुरे -** कर्नाटक येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय विशेष ऑलेम्पीक जलतरण स्पर्धेत १ सुवर्ण व २ रौप्य पदक प्राप्त.

५) **अभिषेक ठवरे -** लोकसत्ता तेजांकित पुरस्कार प्राप्त केला.

६) **लोकेश रंगारी -** सक्षम नागपूर आयोजित मॅराथॉन स्पर्धेत आशादीप स्नेही मंडळ सदस्य अंध प्रवर्गातून प्रथम.

# संस्था विशेष

## आशादीप व्याख्यानमाला पुष्प-७ : दिव्यांग सक्षमीकरणाचे विविध आयाम

**३१ जानेवारी २०२४**
















"दिव्यांगजन अधिकार अधिनियम २०१६ प्रमाणे दिव्यांग पुनर्वसन आणि सक्षमीकरणासाठी राज्य व केन्द्र शासनाच्या अनेक योजना असून नागपूर येथील समेकित क्षेत्रीय दिव्यांगजन सशक्तीकरण केन्द्र (CRC) दिव्यांगतेचा प्रकार आणि तीव्रता ओळखून त्यासाठी योग्य मार्गदर्शन करते. लवकर निदान व उपचार झाल्याने दिव्यांगत्वाची तीव्रता कमी होते आणि ती व्यक्ती आत्मनिर्भर होऊ शकते." अशी माहिती पुनर्वसन अधिकारी श्री संजय पुसाम यांनी आशादीप व्याख्यानमाला (२०२४) मध्ये उपस्थितांना दिली. सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय द्वारे संचलित केन्द्राचे उद्दिष्ट दिव्यांगाना सन्मान पूर्वक जगण्याची संधी देणाऱ्या समावेशक समाजाची निर्मिती करणे आहे. दिव्यांगाना सक्षम करणे ही शासन आणि समाजाची संयुक्त जवाबदारी असून, दिव्यांग पुनर्वसन व सक्षमीकरणासाठी शासकीय योजना राबविताना त्यामध्ये सेवाभावी संस्थाचा महत्वपूर्ण सहभाग अपेक्षित आहे, असे त्यांनी सुचविले. दिव्यांग जन कायदा (२०१६), समग्र शिक्षण अभियान, दिव्यांगांचे विशेष ओळखपत्र (UDID), अर्जुन पोर्टल इ. सविस्तर माहिती दिली. दिव्यांगासाठी कार्यरत सेवाभावी संस्थांनी शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी राज्य व केन्द्र शासनाकडे आपल्या उपक्रमांची माहिती देऊन योग्य प्रकारे नोंदणी करावी असे सुचवले आणि उपस्थितांचे शंका समाधान केले. याप्रसंगी 'आशादीप' इ-नियतकालिका (जून-डिसेंबर २०२३) अंकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. हे नियतकालिका संस्थेच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

या कार्यक्रमात VNIT मधील प्राध्यापक डॉ. कुथे यांनी 'ग्रामीण आरोग्य संपदा सहयोग (GRSS)' या संशोधन प्रकल्पातून ग्रामीण क्षेत्रातील दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी बाम्बू पासून तयार केलेल्या व्हीलचेअरच्या मॉडेलची उपयुक्त माहिती दिली.

कार्यक्रमाला संस्थेचे आणि आशादीप स्नेही मंडळाचे सदस्य आणि इतर दिव्यांग स्नेही संस्थाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## संस्था विशेष

# दिव्यांग सदस्यांसह आदासा कोराडी शैक्षणिक सहल

**१० फेब्रुवारी २०२४**

आशादीप-अपंग, महिला बालविकास संस्थेचे ४० दृष्टिबाधित स्नेहीमंडळ सदस्य आणि १५ मार्गदर्शक सदस्यांची शैक्षणिक सहल भगिनी मंडळ येथून सकाळी साडे आठ वाजता आदासासाठी निघाली. बस मध्येच महिंद्रा अँड महिंद्रा द्वारे प्रायोजित चविष्ट वडापाव चिक्की, बिस्कीट व पेरूचा नाश्ता करून सर्वांनी आदासा येथील. शमी विघ्नेशाचे आणि परिसरातील शिव, हनुमान मंदीरात जाऊन दर्शन घेतले.

सहलीचा दुसरा टप्पा कोराडी येथील मंदिराच्या भव्य आवाराने तेथील प्रसन्नतेने सर्वजण भारावले. आरतीची वेळ झाल्याने सभा मंडपात थांबून आरतीला उपस्थित राहता आले. आरतीनंतर कोराडी मंदिर ट्रस्ट तर्फे प्रायोजित महाप्रसादासाठी प्रसादालयात गेल्यावर सहृदयतेचा अनुभव आला. आपले ताट हातात घेऊन प्रसाद वाढण्याची पद्धती असली तरी दृष्टिबाधितांची अडचण ओळखून सेवकांनी सर्व मुलांना जागेवर बसवून व्यवस्थित वाढले.

भोजनानंतर मंदिराच्या प्रांगणात वृंदा जोगळेकर, सौरभ बोरीकर, पलाश हेडाऊ, वेदिका गेडाम, भारती शेंडे, पवन उराडे यांनी भक्तीगीत,भजन गायले. तसेच मुलींनी उत्साहाने गरबा खेळला. सभागृहात उपस्थित भक्तांनी संस्थेविषयी तसेच सहली विषयीही जाणून घेतले. मंदिर परिसरात भ्रमंतीनंतर 'इंडियन इन्स्टिट्युट ऑफ युथ वेलफेअर' लोणारा केंद्राला भेट देण्यात आली. तेथील स्वागत व आदरातिथ्य सर्वानाच भावले. इन्स्टिट्यूटच्या सदस्यांनी स्नेहीमंडळ सदस्यांना बसमधून उतरवण्यापासून सभागृहात नेण्यासाठी मनापासून साह्य केले. श्रीमती अरूणा सलासल यांनी सर्वांचे स्वागत केले आणि इन्स्टिट्यूट ऑफ युथ वेलफेअरच्या उद्देशांबद्दल व उपक्रमाबद्दल माहिती सांगितली.

संस्थेच्या वतीने सचिव अपर्णा कुळकर्णी व सह कोषाध्यक्ष डॉ. अनघा नासेरी यांनी मनोगत व्यक्त केले. सौरभ बोरीकर व पलाश हेडाऊ यांनी आशादीप संस्थेच्या दिव्यांगांसाठी उपक्रमांची माहिती दिली. तेथील संचालिका डॉ. शिल्पा मिराशी यांनी मुलांशी संवाद साधला आणि सर्वांचा उत्साह वाढवला. तेथील प्रशिक्षकांनी दृष्टिबाधितांना सहभाग घेता येईल असे विविध मनोरंजक खेळ आयोजित केले होते. तसेच स्नेहीमंडळ सदस्यांनी
















# संस्था विशेष



## दिव्यांग सदस्यांसह आदासा कोराडी शैक्षणिक सहल

गाणी सादर केली. तेथील कार्यकर्त्यांनी संस्थेच्या परिसरातील सेंद्रिय शेती, गोबर गॅस प्लांट, कंपोस्ट खत व इतर प्रयोगशाळा इ. बद्दल विस्तृत माहिती दिली. संस्थेतील व्यायामाच्या उपकरणांवरती व्यायाम करण्याचीही मौज मुलांनी घेतली आणि मावळत्या सूर्याबरोबर सुखद स्मृति सह पुढच्या सहलीची उत्सुकता मनात घेऊन सर्व सदस्य समाधानाने आपापल्या घरी गेले.

सहलीचा आनंद भरभरून घेतल्यानंतर मुलांनी त्याच्या सकारात्मक प्रतिक्रीया रेकॉर्ड करून पाठवल्या.







## दृष्टिहीन अधिवक्ता नंदिता त्रिपाठी यांचा आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त सन्मान

**१६ मार्च २०२४**







दृष्टिहीन अधिवक्ता नंदिता त्रिपाठी यांना स्वर्गीय श्रीमती गौरी शिरखेडकर पुरस्काराने सन्मानित करून आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. नंदिता त्रिपाठी या गेल्या २५ वर्षांपासून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात अंध वकील म्हणून कार्यरत असून त्यांना पहिली अंध सरकारी वकील आणि पहिली अंध नोटरी होण्याचा मान मिळाला आहे. त्यांच्या गुरू आणि उच्च न्यायालयातील प्रख्यात ज्येष्ठ वकील कुमकुम शिरपूरकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांनी तिच्या लढाऊ भावनेचे आणि प्रामाणिक प्रयत्नांचे कौतुक केले. सत्काराला उत्तर देताना नंदिता यांनी आशादीप संस्थेचे आभार मानले आणि आशादीप संस्था यांचे विचार समाजाने अंगिकारल्यास कोणतेही शारीरिक अपंगत्व माणसाला रोखू शकत नाही अशी भावना व्यक्त केली. स्वर्गीय श्रीमती गौरी शिरखेडकर पुरस्कार श्री. विवेक शिरखेडकर यांनी त्यांच्या पत्नीच्या स्मृतीप्रित्यर्थ या वर्षीपासून स्थापन केले असून आशादीप तर्फे हा पुरस्कार प्रतिवर्षी कर्तृत्ववान दिव्यांग महिलेला अथवा दिव्यांगांसाठी कार्यरत महिलेला देण्यात येईल. कार्यक्रमाला शिरखेडकर परिवाराचे सदस्य व स्नेही उपस्थित होते.

## संस्था विशेष

# 'श्रीकांत' : एक अनुभूती

**१४ मे २०२४**











सर, मै देश का सबसे पहला विजुअली चैलेंज्ड प्रेसिडेंट बनना चाहता हूं। श्रीकांत बोल्लाच्या या वाक्यावर सगळ्या मुलांनी टाळ्यांचा कडकडाट केला आणि आम्हाला खूप छान वाटलं. 'आशादीप' अपंग महिला-बाल विकास संस्थेने १४ मे २०२४ रोजी स्नेही मंडळाच्या सदस्यांसाठी 'श्रीकांत' या बायोपिकचा शो आयोजित केला होता आणि सिनेमा सुरू असताना सर्व दृष्टिबाधित मुलांचा हा उत्साहवर्धक प्रतिसाद मनाला सुखावणारा होता.

श्रीकांत या बायोपिक विषयी वर्तमानपत्रातील अभिप्राय वाचून हा सिनेमा दृष्टिबाधित मुलांना दाखवावा, असे आम्ही संस्थेच्या कार्यकारिणीच्या सभेमध्ये ठरवले. दृष्टिबाधित मुलांना दिसणार नाही तर सिनेमा कसे बघतील आणि त्यांना सिनेमा कसा समजेल याविषयी पण आम्ही बरीच चर्चा केली. आमच्यातील अनुभवी सदस्य मात्र याबाबतीत खात्रीपूर्वक म्हणाल्या की दृष्टिबाधित मुले ही सिनेमा, गाणी या गोष्टींचा अनुभव शकतात. हा सिनेमा इटर्निटी मॉल मधील सिनेमॅक्स टॉकीज मध्ये लागला होता. ही जागा मध्यवर्ती ठिकाणी असल्याने व बसने पोचण्यासाठी सोयीची आहे. त्यामुळे हे टॉकीज पक्के केले व टॉकीजच्या व्यवस्थापकांना भेटलो. त्यांच्याकडून अतिशय सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि दोन दिवसांनंतरचा दुपारी बाराचा शो पक्का केला.

संस्थेच्या १० कार्यकारिणी सदस्यांसोबत सुमारे ५० तरुण उत्साही दृष्टिबाधित सदस्य व दृष्टीबाधित परीक्षार्थींना मदतीचा हात देणारे १० लेखनिक, असे एकूण ७० जण 'आशादीप' संस्थेकडून सिनेमा बघण्यासाठी उपस्थित होते. अर्धा तास आधी आम्ही सगळे इटर्निटी मॉल ला पोचलो व लिफ्टने मुलांना चवथ्या मजल्यावरील सिनेमागृहाच्या लाउंज मध्ये नेले. पोस्टर्स समोर उभे राहून फोटो - सेल्फीज, सिनेमा विषयीच्या गप्पा वगैरे गोष्टी करत मजेत वेळ गेला आणि बरोबर वेळेत सिनेमागृहाच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने सर्वांना सीटवर बसवले.

अनेक अडथळ्यांवर मात करून एक यशस्वी उद्योजक बनलेल्या दृष्टिहीन श्रीकांत बोल्लाच्या प्रोत्साहक यशोगाथेची गोष्ट या सिनेमात आहे. आंध्र प्रदेश मधील एका छोट्याशा खेड्यात जन्मलेला श्रीकांत बोल्ला हा जन्मांध मुलगा! सामान्य मुलांसारखे विज्ञान शाखेत शिक्षण मिळावे म्हणून त्याने न्यायालयाकडे धाव घेतली आणि सर्व अंध मुलांच्या विज्ञान शाखेतील शिक्षणाचा मार्ग खुला केला. मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या स्लोन स्कूल ऑफ मॅनेजमेंटमध्ये, मॅनेजमेंट सायन्समधील तो पहिला आंतरराष्ट्रीय दृष्टिहीन विद्यार्थी होता. सामान्यांसारखा व्यवसाय करता यावा यासाठी प्रस्थापितांशी संघर्ष करीत श्रीकांतने स्वतःचा व्यवसाय सुरु केला. 'बोलंट इंडस्ट्रीज'चा संस्थापक अध्यक्ष म्हणून एक यशस्वी भारतीय उद्योगपती झाला आणि सर्व दिव्यांगांना आत्मनिर्भर होऊन यशस्वी जीवन जगण्याचा मार्ग दाखवला. श्रीकांत बोल्ला याने सिद्ध केलं आहे की

**'घणाचे घाव घालावे, गळावा घात अंगीचा,**
**यशोदेवी तयासाठी करी घे हार पुष्पांचा'**

मोबाईल वर XL CINEMA ही App डाऊनलोड करून सिनेमात जिथे संवाद नसतात, तिथे त्या प्रसंगाचे वर्णन करणारे ऑडिओ ऐकता येतात व या तंत्रज्ञानाच्या मदतीने दृष्टीबाधित पण सिनेमाचा पुरेपूर आनंद घेऊ शकतात. काही सिनेमात हे ऑडिओ फीचर नसेल तर दिल्लीच्या 'सक्षम' या संस्थेने हे सिनमा निर्मात्यांची परवानगी घेऊन हे ऑडिओ फीचर सिनेमात उपलब्ध करून दिलेले आहे. त्यामुळे पडद्यावर संभाषण होत नसताना होणाऱ्या घटनांचे वर्णन अंध ऐकू शकतात. बऱ्याच नवीन सिनेमांत, सिनेमा तयार करतानाच त्याचं ऑडिओ डिस्क्रिप्शन टाकल्या जातं. ते बाकीच्यांना ऐकू येत नसतं पण XL CINEMA ही App फोनवर असल्यास ते अंधव्यक्ति मोबाईलला हेडफोन लावून ऐकू शकतात.

# संस्था विशेष

## दृष्टिबाधित विद्यार्थ्यांना समवेत 'श्रीकांत' सिनेमा






या App च्या मदतीने सर्व दृष्टीबाधित मुलांनी, श्रीकांतच्या संवादांचे स्वागत करीत, त्याचा दृढनिश्चय, आत्मविश्वास आणि संघर्षानंतर मिळवलेले यश मोठ्या टाळ्या वाजवून व्यक्त करीत सिनेमाचा आस्वाद घेतला. मध्यंतरात सिनेमागृहाच्या व्यवस्थापन विभागाकडून मुलांना पॉपकॉर्न आणि थंड पेय देण्यात आले.

दृष्टिबाधित तरुण मुला-मुलींसोबत चित्रपट पाहणे हा एक अनोखा अनुभव होता. श्रीकांत आत्मविश्वासाने खडतर परिस्थितीचा सामना करताना आणि जिंकताना प्रत्येक वेळी त्याचे मनोधैर्य दिसते, त्याच्या मनाचा निर्धार व्यक्त करताना त्याची जिद्द आणि चिकाटी त्याच्या शब्दात जाणवते. अशा वेळी प्रत्येक दृष्टिबाधित टाळ्या वाजवत होता. हा अनुभव सिनेमा गृहातील इतर प्रेक्षकांनाही अचंबित करणारा होता. ज्या दृष्यांना, वाक्यांना मोठ्या प्रमाणात टाळ्या मिळाल्या, ते असे -

''मै भाग नही सकता, केवल लड़ सकता हूं!'' शाळकरी मुलगा असतांना कठीण परिस्थितीचा सामना करण्याचा श्रीकांतचा निर्धार या वाक्यातून दिसून येतो.

जेव्हा भारताचे राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी श्रीकांतला पुढे काय करायचे आहे हे विचारले तेव्हा तो सांगतो, सर मैं देश का पहला विजुअली चैलेंज्ड प्रेसिडेंट बनना चाहता हूं।

स्वतःच्या बुद्धिमत्तेवर आणि क्षमतेवर विश्वास असणारा श्रीकांत कॉलेजच्या प्रिन्सिपलला सांगतो, ''इंडिया के किसी भी कॉलेज में जिसे पैसे भरकर भी एडमिशन नहीं दिया उसे दुनिया के चार टॉप यूनिवर्सिटीज में स्कॉलरशिप देकर बुलाया है।''

सामान्य माणसाने आपली दया करू नये हे सांगताना ''आपने अपने दिमाग में हमारे लिए अलग ही कहानी बना बना रखी है । बेचारा, कितना बुरा हुआ उसके साथ! कुछ बुरा नहीं हुआ है हमारे साथ और बेचारे तो हम बिल्कुल ही नहीं है! आप हमारे चक्कर में मत फसना! आप को बेंचकर खा जाएंगे हम!''

त्यांच्या व्यवसायातील भागीदार रवि मंथा यांना तो सांगतो की, ''आपको पता है एक विजनरी आदमी ने ऑलरेडी मेरे स्टार्टअप में इन्वेस्ट कर दिया है डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम।''

व्यावसायिक यश मिळाल्यानंतर जेव्हा श्रीकांत बोल्ला याला पुरस्कार मिळतो तेव्हा, त्याच्यावर विश्वास ठेवून आयुष्यभर त्याला सोबत करणारी, तसेच त्याच्या कर्तृत्व आणि आत्मविश्वासाबरोबर संवेदनशीलता जागृत ठेवणारी त्याची शिक्षिका देविका ही त्याची रोल मॉडेल आहे हे तो सांगतो आणि पुढे म्हणतो, ''मला व्यवसायात माझ्यासारख्या व्यक्तिंना अधिक संधी द्यायची आहेत, कारण आम्हाला फक्त संधीची गरज आहे.''

सिनेमानंतर सर्व मुलांच्या प्रतिक्रिया बोलक्या होत्या. कोणत्याही दिव्यांगाने स्वतःला कमी लेखू नये. 'हिंमते मर्दा तो मर्द ए खुदा',... माणसात हिंमत असेल तर तो कोणतेही काम करू शकतो. त्याने कोर्ट केस केली नसती, तर आपण सायन्स शिकू शकलो नसतो. हिंमत हारू नये आणि सामान्य नागरिकांनी दृष्टिहीन लोकांना कमी लेखू नये. दृष्टिबाधित तरुणांना प्रेरणादायी ठरावा असा हा सिनेमा आहे.

प्रत्येक दृष्टिबाधिताला त्याच्या क्षमतेनुसार काम मिळाले पाहिजे. समाजात सहृदयता, संवेदनशिलता बाळगत दिव्यांगांसाठी सहकार्याचा हात पुढे करून त्यांना संधी उपलब्ध करून देण्याची समाजाची जबाबदारी आहे याची जाणीव झाली. श्रीकांत बोल्ला या जन्मांध मुलांची यशोगाथा पडद्यावर दृष्टिबाधित तरुणाईच्या सोबत बघण्याचा अनुभव सामान्यांसाठी पण खूप शिकवणारा होता.

**- वृंदा जोगळेकर**

## शैक्षणिक कार्यानुभवासाठी संस्थेचे सहकार्य

१) PES College बंगरूळ येथील B.E. Design (द्वितीय वर्ष) येथील विद्यार्थिनी तनया तारे ने "Human Factor in Design" या शैक्षणिक प्रकल्पात आशादीप दिव्यांग प्रेरणा केंद्रातील ५ दिव्यांगांची Video call द्वारे मुलाखत घेऊन त्यांना दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणीची माहिती घेतली आणि या माहितीच्या आधारे दृष्टिबाधितांसाठी उपयोगी वॅलेटचे प्रारूप तयार केले.

२) रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनियरींग येथील Data Science (द्वितीय वर्ष) तीन विद्यार्थी सेवाभावी संस्थेतील शैक्षणिक कार्यानुभावासाठी संस्थेत रूजू झाले. यामध्ये त्यांनी संस्थेच्या ऑडिओबुक प्रकल्प आणि पोषक आहार उत्पादन केंद्राच्या माहितीचे सुलभ सोयीस्कर वर्गीकरण करून दिले.

# सदिच्छा भेट

## डॉ. त्रिपाठी, ट्रस्टी कोरडी संस्थान, डॉ. रडके, माजी डीन, शासकीय दंत महाविद्यालय यांची संस्थेला सदिच्छा भेट.

**दि. २१ फेब्रुवारी २०२४**



## श्री अनिल जोशी यांची संस्थेला सदिच्छा भेट

**दि. २२ मार्च २०२४**



## प्रियदर्शनी कॉलेज ऑफ मॅनेजमेंटच्या प्राध्यापकांची आशादीप संस्थेस सदिच्छा भेट

**दि. ४ मे २०२४**

आशादीप मधील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा आढावा घेऊन रोजगाराच्या संधी बद्दल चर्चा करण्यासाठी आणि त्यासाठी संयुक्त उपक्रम राबविण्यासाठी प्रियदर्शनी कॉलेज ऑफ मॅनेजमेंटचे डीन श्री.कार्तिक उत्तरवार आणि प्रोफेसर संचल तरोडे (प्लेसमेंट अँड ट्रेनिंग ऑफिसर) सह दिव्यांग दंत तिरंदाज श्री. अभिषेक ठावरे यांनी संस्थेला भेट दिली आणि दृष्टीबाधित विद्यार्थ्यांचे संगणक कौशल्य जाणून घेतले. प्रोफेसर संचल तरोडे यांनी विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. उपस्थित सर्व स्नेहीमंडळ सदस्यांनी नोकरीसाठी येणाऱ्या अडचणी, कोंचिंग संदर्भातील अपेक्षा मोकळेपणाने सांगितल्या. त्या सर्व समस्यांचा विचार करून काही योजना राबविण्याचे आश्वासन त्यांनी दिले. डीन श्री. कार्तिक उत्तरवार यांनी स्नेहीमंडळ सदस्यांना कॉलेज भेटीचे आमंत्रण दिले तसेच पुढील संस्था भेटीत अधिक मुलांना घेऊन येवू आणि सहकार्याचा हात पुढे करु असे आश्वासन दिले. श्री.अभिषेक ठावरे यांनी लेखनिक उपक्रमात पुढाकार घेवून पुढच्या वर्षी नवीन योजना सुरू करू असे सुचविले. आचल राठोड आणि पलाश हेडाऊ यांनी गीत सादर केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिमा शास्त्री आणि संचालन अपर्णा कुळकर्णी यांनी केले. अतिथींचा परिचय सुप्रिया केकतपूरे आणि गीता तारे यांनी आभार प्रदर्शन केले.













# डॉ. राजेंद्रसिंह एक्सप्लोरेटरीला सदिच्छा भेट

**दि. ९ मार्च २०२४**





शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान जागृतीसाठी कार्यरत डॉ. राजेंद्रसिंह एक्सप्लोरेटरीला संस्थेच्या सदस्यांनी भेट दिली. डायरेक्टर डॉ. सीमा उबाळे आणि इतर सहकार्यांनी तेथील उपक्रमांची सविस्तर माहिती दिली आणि संस्थेच्या सहकार्याने कार्यक्रम घेण्याची तयारी दर्शविली.

# प्रदर्शनात सहभाग

**६-७ जानेवारी २०२४**

Vidarbha Surgeons Association तर्फे आयोजित संमेलनात संस्थेच्या पोषक उत्पादनांच्या स्टॉलला असोसिएशन चे पदाधिकारी, डॉ. राज गजभिये, डॉ. मुकुंद ठाकूर, डॉ. प्राची महाजन, डॉ. मृणालिनी बोरकर व इतर मान्यवरांनी भेट देऊन माहिती घेतली.









# दिव्यांग प्रेरणा

## सत्संग सेवा मिशन नागपूर तर्फे आशादीपच्या दिव्यांग सदस्यांना ब्लॅन्केट वितरण

**१३ जानेवारी २०२४**






सत्संग सेवा मिशन नागपूर तर्फे आशादीपच्या १२० दिव्यांग लाभार्थी सदस्यांना ब्लॅंकेट आणि स्नॅक्सचे वितरण करण्यात आले. सत्संग सेवा मिशन सदस्यांनी उपस्थित दिव्यांग सदस्यांशी संवाद साधला आणि आशादीपच्या सदस्यांकडून संस्थेच्या कार्याची माहिती घेतली. भविष्यातही दिव्यांग पुनर्वसनासाठी एकत्रित उपक्रम घेण्यासाठी चर्चा झाली.

## सक्षम नागपूर महानगर तर्फे दिव्यांगांसाठी आयोजित सक्षम मॅरेथॉन

**१० फेब्रुवारी २०२४**







सक्षम नागपूर महानगर तर्फे दिव्यांगांसाठी आयोजित करण्यात आलेल्या सक्षम मॅरेथॉन मध्ये आशादीप स्नेही मंडळ सदस्यांचा तसेच अपर्णा कुलकर्णी, इंदिरा देशमुख यांचा उत्साही सहभाग होता. शारीरिक शिक्षण महाविद्यालय हनुमान नगर येथे सकाळी मॅरेथॉन साठी एकत्रित खेळाडुंना सक्षम तर्फे टी-शर्ट चे आणि खाऊचे वाटप करण्यात आले. मॅरेथॉनमध्ये लोकेश रंगारीने मुलांमध्ये प्रथम क्रमांक मिळविला आणि ईश्वरी पांडेचा विशेष सत्कार करण्यात आला.

---

## दिव्य-क्षम २०२४ विदर्भ प्रांत अधिवेशन

**१८ फेब्रुवारी २०२४**

समदृष्टी क्षमता विकास व अनुसंधान मंडळ (सक्षम) तर्फे आयोजित दिव्य-क्षम २०२४ विदर्भ प्रांत अधिवेशनात विविध सत्रात मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी ८ यशस्वी दिव्यांगांचा सत्कारही करण्यात आला. ईश्वरी पांडे आणि चमूने आशादीप संस्थेचे निर्धार गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. अधिवेशनात दिव्यांगांच्या विविध संस्थांचे स्टॉल्स् होते. आशादीपतर्फे मसाज, फिनाईल, उदबत्या व कापसाचे गणपती यांचा स्टॉल होता. संस्थेतर्फे अपर्णा कुळकर्णी आणि इंदिरा देशमुख यांच्यासह दिव्यांग स्नेहीमंडळ सदस्यांची उपस्थिती होती.



# दिव्यांग प्रेरणा

## श्री. सुरेश गुरू यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आशादीप संस्थेस गुरू परिवारातर्फे शैक्षणिक साहित्याची देणगी

**४ एप्रिल २०२४**









श्री. सुरेश गुरू यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आशादीप सदस्य सौ. अनुपमा गुरू यांचे सुपुत्र श्री. अभिजित गुरू व स्नुषा सौ. समिधा गुरू यांनी सामाजिक बांधिलकी जपत ७५ दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी ६ वह्या व पेन दिव्यांगांच्या शाळेत देण्यासाठी आशादीप संस्थेस दिल्या. आपल्या शिक्षक आई वडिलांचा खरा सन्मान त्यांनी केला, हे खरचं कौतुकास्पद व प्रेरक आहे.

५ एप्रिल २०२४ रोजी डॉ. प्रतिमा शास्त्री आणि डॉ. नूतन देव यांनी सोनेगाव मूक बधिर निवासी विद्यालय येथील ४० विद्यार्थ्यांसाठी संचालक श्री धोटे व मुख्याध्यापिका श्रीमती पोफळी यांच्या उपस्थितीत शैक्षणिक साहित्यांचे वितरण केले.

९ एप्रिल २०२४ रोजी स्नेहांगण शाळेत श्री. सुरेश गुरू, सौ. अनुपमा गुरू, डॉ. सौ. प्रतिमा शास्त्री आणि सौ. अपर्णा कुळकर्णी यांच्या उपस्थितीत ४५ विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य आणि खाऊ देण्यात आला. स्नेहांगण शाळेतील मुलांनी श्री सुरेश गुरू यांचे शुभेच्छा गीताने अभिनंदन केले. श्री. सुरेश गुरू यांचे अमृत महोत्सवानिमित मनःपूर्वक अभिनंदन! जीवेत शरदः शतम्।।

## 'आशादीप' तर्फे दिव्यांगांच्या आत्मनिर्भरतेसाठी कार्यशाळेचे आयोजन

**दि. २६ एप्रिल २०२४**











दिव्यांगांच्या आत्मनिर्भरतेसाठी लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाच्या सहयोगाने आयोजित कार्यशाळेत डॉ. विजय करडभाजणे व श्री शुभम वाघ यांनी फिनाईल, हॅन्डवॉश, लिक्विड सोप व पावडर डिटर्जंट तयार करण्याचे प्रशिक्षण दिले. त्यामध्ये अंशतः दृष्टिबाधित, अस्थिव्यंग ग्रस्त आणि कर्णबधिर प्रशिक्षणार्थीचा सहभाग होता. प्रशिक्षकांनी दिव्यांगांच्या अडचणी लक्षात घेऊन योग्य रीतीने मार्गदर्शन केले. यापुढेही अश्या प्रकारचे शिबीर घेण्याचे आणि दिव्यांगांना मदत करण्यासाठी संस्थेशी जोडुन राहण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी श्री प्रसन्न सोहोळे (माजी संचालक, RN Chemicals) यांनी प्रशिक्षणार्थीना प्रमाणपत्र दिले आणि प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच श्री पाटील यांनी या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी दृष्टिबाधित अक्षरा बाविस्करला संगीत प्रशिक्षणासाठी कराओके देण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. प्रतिमा शास्त्री यांनी कार्यशाळेची पार्श्वभूमी सांगून व्यवसायात उत्पादनाच्या योग्य गुणवत्तेचे महत्व सांगितले. प्रशिक्षकांचा परिचय व कार्यक्रमाचे संचलन डॉ. वृंदा जोगळेकर यांनी केले व प्रकल्प समन्वयक गीता तारे यांनी आभार व्यक्त केले.

# आरोग्य आणि पोषण केंद्र

## खेळाडूंसाठी 'योग्य पोषक आहाराचे महत्व' कार्यशाळा

**१३ जानेवारी २०२४**

क्रीडा स्पर्धा मध्ये खेळाडू च्या उत्कृष्ट कामगिरी साठी वेगवेगळ्या क्रीडा प्रकाराच्या अनुषंगाने योग्य पोषक आहाराचे नियोजन अत्यंत महत्वाचे आहे असे आहार तज्ञ मेघना पंडित यांनी सांगितले. आशादीप आरोग्य पोषण केंद्र आणि राजकुमार केवलरमानी कन्या महाविद्यालय यांनी संयुक्तरीत्या आयोजित कार्यशाळेत त्यांनी महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. चेतना भट यांनी केले होते.






## जागतिक आरोग्य दिनानिमित्त श्री. अनिल जोशी यांचे 'अक्षमतेकडून क्षमतेकडे वाटचाल' या विषयावर मार्गदर्शन

**१३ एप्रिल २०२४**






राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित डाऊन सिंड्रोम असलेली देवांशी जोशी यांचे पिता श्री. अनिल जोशी तीन दशकाहून अधिक काळ डाऊन सिंड्रोम सहित सर्व प्रकारच्या दिव्यांगांना समाज प्रवाहात आणण्यासाठी कार्यरत आहेत. दिव्यांग व्यक्ति म्हणजेही एक व्यक्ति असते. त्यामुळे सर्व प्रकारच्या दिव्यांगांकडे मानवीय भावनेने बघणे जरूरी आहे. आपल्या मुलाच्या दिव्यांगत्वाचा स्वीकार आणि त्याच्या क्षमतांच्या विकासाची प्रक्रिया शक्य तितक्या लवकर सुरू करावी. दिव्यांग असूनही आत्मनिर्भर होऊन राष्ट्रविकासात ते निश्चितच योगदान देतील. तसेच त्यांना सुद्धा सर्व अधिकार मिळवून देण्याचे कार्य समाजाने एकत्रितपणे करायला हवे म्हणजे सामाजिक आरोग्य उत्तम राहील. त्यांना आनंद मिळवून देण्यासोबतच त्यांच्या पालकांकडे बघण्याचा सहसंवेदनशिल दृष्टिकोन समाजात विकसित व्हायला हवा जेणेकरुन दिव्यांगांचे पालक आपले मानसिक आरोग्य उत्तम ठेवून त्यांच्या दिव्यांग मुलांचा विकास अधिक सक्षमतेने घडवून आणू शकतील. श्री जोशींनी या क्षेत्रात त्यांना आलेले अनुभव उत्तमरित्या मांडले,तसेच डाउन सिंड्रोम मुलांच्या पालकांच्या प्रतिक्रिया, देवांशी आणि इतर मुलांच्या आत्मनिर्भरतेचा प्रवास व्हिडिओद्वारा उलगडला. यानंतर उपस्थित सर्वांचे त्यांनी शंका समाधान केले.

याच कार्यक्रमात आशादीप स्नेहिमंडळ सदस्य श्री. हर्षल पराते यांचे नुकतेच बँकेत असिस्टंट मॅनेजर म्हणून प्रमोशन झाल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. आशादीप स्नेहिमंडळ सदस्यांना पेन ड्राईव्ह, ऑडियो प्लेअर वितरीत करण्यात आले.

जागतिक आरोग्य दिन (२०२४) चे ब्रीदवाक्य 'माझे आरोग्य माझा अधिकार' ही माहिती दिव्यांग आणि सर्व समाजातील प्रत्येकापर्यंत पोहचण्यासाठी आपण प्रयत्न केला पाहिजे असे डॉ. प्रतिमा शास्त्री यांनी प्रास्ताविकात सांगितले. डॉ नूतन देव यांनी श्री. अनिल जोशी यांचा परिचय करून दिला. श्री. लालासाहेब पाटील यांनी अध्यक्षीय समारोपात सर्वांनी एकत्रितपणे दिव्यांग विकासासाठी कार्यरत राहावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन अपर्णा कुळकर्णी यांनी केले. आभार प्रदर्शन सुप्रिया केकतपुरे यांनी केले.

व्याख्यानास नॉरकॉड, इंद्रधनू, इ. तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी, सदस्य, दिव्यांग मुले तसेच विशेषतः डाऊन सिंड्रोम मुलांचे पालक यांची उपस्थिती होती .

# आरोग्य आणि पोषण केंद्र

## आशादीप आरोग्य पोषण केंद्रातर्फे 'पोषण पखवाडा' निमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन व चित्रकला स्पर्धा

**२३ मार्च २०२४**







केन्द्र शासनाने जाहीर केलेल्या दिनांक ९-२३ मार्च २०२४ या 'पोषण पखवाडा' अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी 'पोषण भी पढाई भी' या विषयावर अपंग, महिला आणि बाल विकास संस्था व न्युट्रिशन सोसायटी ऑफ इंडिया यांचे संयुक्त विद्यमाने प्रो. राजेंद्रसिग सायन्स एक्सप्लोरेटरी धरमपेठ यांच्या सहकार्याने पोषण जागृति व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. सायन्स एक्सप्लोरेटरीच्या डायरेक्टर डॉ. सीमा उबाळे यांनी प्रास्ताविक केले. आशादीप अध्यक्षा डॉ. प्रतिमा शास्त्री यांनी संतुलित आहाराची माहिती देणारा ''खूब बढेंगे हम'' हा व्हिडियो दाखवून त्यावर आधारित प्रश्नमंजूषेच्या आधारे विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाला उत्साही प्रतिसाद मिळाला. सर्व विद्यार्थांना खाऊ देण्यात आला. चित्रकला स्पर्धेत सहभागी १५ स्पर्धकांच्या चित्रांचे विद्या करपटे, गीता तारे आणि रमा खडक्कार यांनी मुल्यमापन केले.

६ एप्रिल २०२४ रोजी चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले आणि सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना आहारगीत परिपत्रक वितरित करण्यात आले. यासाठी प्रो. राजेंद्रसिग सायन्स एक्सप्लोरीटरीच्या संचालिका डॉ. सीमा उबाळे आणि तेथील स्टाफचे उत्तम सहकार्य मिळाले.

# आरोग्यम् धनसंपदा



## जागतिक व्हिटिलिगो दिन

**२५ जून २०२४**

- डॉ. मिलींद बोरकर
त्वचारोग तज्ञ,
एन.के.पी. साळवे मेडीकल कॉलेज, नागपूर

''व्हिटिलिगो'' (VITILIGO), ''ल्यूकोडर्मा'' (LEUCODERMA) किंवा सर्वसामान्यपणे ''कोड'' या नावाने परिचित असलेली स्थिती, ही त्वचेशी संबंधित समस्या आहे, ज्यामध्ये त्वचेच्या काही पेशींमध्ये रंगद्रव्य (MELANIN) तयार होण्याची प्रक्रिया मंदावते व हळूहळू नष्ट होते. याचा परिणाम म्हणजे काही भागात त्वचेवर पांढरे डाग दिसू लागतात, आणि ते हळूहळू वाढतात.

**प्रादुर्भाव** - व्हिटिलिगो ची समस्या वर्ण व लिंगावर आधारित कोणताच भेदभाव करीत नाही. पण काही प्रमाणात ह्या समस्येमध्ये १०% लोकांमध्ये अनुवंशिकता आढळते. तसेच ही समस्या ऑटोइम्यून (AUTOIMMUNE) आजारांच्या व्यक्तींमध्ये जास्त प्रमाणात आढळून येते. या व्यतिरिक्त मानसिक तणाव, धाकाधाकीची जीवनशैली यांचाही या अवस्थेवर परिणाम होऊ शकतो. जगात व्हिटिलिगो ग्रस्तांचे प्रमाण १% आहे. भारतात याचे प्रमाण ४% असल्याची आकडेवारी आहे. व्हिटिलिगो कोणत्याही वयात होऊ शकतो. परंतु वयाच्या ३० वर्षापर्यंत जास्त दिसून येतो. व्हिटिलिगो च्या प्रादुर्भावात वर्णभेद नसला तरी गडदवर्ण असलेल्या व्यक्तिंच्या त्वचेवर हा विरोधाभास जास्त स्पष्टपणे दिसून येतो.

**उपचार** - ह्यासाठी सर्वप्रथम वाढ थांबविण्यासाठी काही व रंग आणण्यासाठी काही उपचार असतात. टॉपिकल थेरपी, फोटोथेरपी या उपचारांने समस्या काही प्रमाणात कमी होऊ शकते. त्वचा रोपण शस्त्रक्रिया करून दृश्य भागावरील डाग झाकले जातात. परंतु पुन्हा नवे डाग येऊ शकतात.

**व्हिटिलिगो ग्रस्तांच्या समस्या** - व्हिटिलिगोमुळे कुठल्याही प्रकारचे शारिरिक क्रियांवर बंधन येत नाही. पूर्वीच्या काळी कुष्टरोग व कोड एकच मानले जायचे. त्याबद्दल समाजात अनेक गैरसमज व पूर्वग्रह आहेत. त्यामुळे प्रभावित व्यक्तींच्या जीवन गुणवत्तेवर लक्षणीय परिणाम होतो. शरीराच्या दृश्य भागावर डाग असल्यास त्या व्यक्तीला भेदभाव, सामाजिक विलगीकरण इ.चा सामना करावा लागतो. यामुळे चिंता, नैराश्य, एकटेपणा बरोबरच त्यांचा आत्मसन्मान आणि मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो. किशोर वयातील मुला-मुलींना, मित्र-मैत्रिणींकडून हेटाळणी, तर प्रौढांना वैयक्तिक नाते संबंध आणि व्यावसायिक क्षेत्रात समस्या येऊ शकतात.

**समाजाची भूमिका** - सर्वप्रथम व्हिटिलिगो या समस्येबद्दल गैरसमज दूर करण्यासाठी समाजाचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. शरीरावर येणाऱ्या पांढऱ्या डागांचा कुष्ठरोगाशी संबंध असल्याचा पूर्वाग्रह लोकांच्या मनात असतो, परंतु या दोन्ही रोगांचा काहीही संबंध नाही. व्हिटिलिगो संसर्गजन्य नसून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संपर्कातून त्याचा प्रसार होत नाही. तथापि समाजात ही मानसिकता असेपर्यंत समस्याग्रस्त व्यक्तींचे समुपदेशन, पाठिंबा गट आणि मार्गदर्शन महत्वाचे आहे. त्या व्यक्ती बरोबरच त्याचे कुटुंबीय आणि सहकारी यांचेही योग्य समुपदेशन केल्याने सुसंवाद निर्माण होईल आणि व्हिटिलिगो ग्रस्त व्यक्ती मोकळेपणाने समाजात समाविष्ट होऊन त्यांचे योगदान देतील. ह्या उद्दिष्टांसाठी जागतिक व्हिटिलिगो दिनाचे आयोजन करण्यात येते. आपण सर्व या चळवळीत सहभागी होण्याचा निश्चय करू. आता लोकांची शैक्षणीय स्तर उंचावल्यामुळे त्यांच्यातला हा गैरसमज काही प्रमाणात दूर झाला आहे. पण अजूनही ही बाब सर्व स्तरातील लोकांपर्यंत पोहोचायला हवे. त्यासाठी प्रसार माध्यमे, स्वयंसेवी संस्था अशा विविध गटांने समोर यायला हवे.

पुणे येथील डॉ. माया तुळपुळे यांनी स्थापन केलेली श्वेता असोसिएटस ही संस्था वैद्यकीय उपचाराबरोबरच समुपदेशन, समाज प्रबोधन, विवाह मेळावा, इ.प्रकारे यासाठी सातत्याने कार्यरत आहे.

# सकस आणि सुरस



## नाचणीचा केक

**साहित्य** - १ वाटी प्रत्येकी नाचणी सत्व, बारीक रवा आणि पिठी साखर, दही आणि दूध, १/२ वाटी साजूक तूप, २ चमचे कोको पावडर, १/२ चमचा मीठ, १/२ चमचा बेकिंग सोडा, ६-८ थेंब व्हॅनिला इसेन्स.

**कृती** - रवा, नाचणी सत्त्व आणि कोको पावडर आणि मीठ एकत्र करून चाळून घ्यावे. दूध व दही एकत्र करून घ्यावे. एका पसरट भांड्यात तूप व पिठी साखर एकत्र हलके होई पर्यंत फेटून घ्यावे. त्यामध्ये दही दूध मिश्रण आणि चाळलेले कोरडे पीठ थोडे थोडे घालून एकच दिशेने मिसळावे, गोळे होऊ देऊ नये. पूर्ण साहित्य मिसळल्यानंतर रवा मुरण्यासाठी मिश्रण अर्धा तास झाकून ठेवावे.

ओव्हन प्री हीट केल्यावर १/४ वाटी दुध व बेकिंग सोडा मिसळून वरील मिश्रणात टाकावे आणि नीट मिसळून तूप लावलेल्या बेकिंग टिन मध्ये काढावे. ओव्हनमध्ये १८० डिग्री सेल्सिअस वर ३५-४० मिनिटे बेक केल्यावर केक भांड्याच्या बाजूने सुटू लागला, म्हणजे ओव्हनच्या बाहेर काढून थंड झाल्यावर कापावा.

**टीप**-केक ओव्हनमध्ये ठेवण्यापूर्वी वरून काजूचे बारीक तुकडे टाकावे.

- डॉ. प्रतिमा शास्त्री

## भरारी

# वकिली क्षेत्रातील स्टिफन हॉकिन्स ॲड. प्रीति पटवा







'बुद्धिमत्ता व जिद्दीने काहीही साध्य होऊ शकते' हे सिद्ध करणाऱ्या इचलकरंजीच्या ॲड. प्रीति पटवा ह्या 'मस्क्युलर डिस्ट्रॉफी' वर मात करत गेली. २५ वर्षे घरातल्या बेडवर एका जागेवर बसून एक संघर्षमय जीवन आनंदाने जगतात. जीवनावर प्रेम करतात.

ॲड. प्रीति पटवा ह्या सधन मारवाडी कुटुंबातील असून बुद्धिने तल्लख. त्या बारावीत कलाशाखेत इचलकरंजी केंद्रात प्रथम आल्या. त्यानंतर बी.ए. इंग्लिशला प्रवेश घेतला. सोबत महाराष्ट्रभर वक्तृत्व स्पर्धेतील यश असा जीवनाचा प्रवास व्यवस्थित सुरू होता. बी.ए. ला गुणवत्ता यादीत आल्या. सांगलीला कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी एन.एस.लॉ कॉलेजला प्रवेश घेतला. त्यांना सुप्रीम कोर्टात प्रॅक्टिस करायची होती. त्या म्हणतात, ''आपल्या राज्यघटनेत जे मूलभूत हक्क आहेत ते समाजाला मिळत नाहीत. समाजाला न्याय मिळवून द्यायचा ह्या हेतूने मी (लॉ) कायद्याचा अभ्यास करण्याचे ठरविले''. अनेक स्वप्न मनाशी बाळगून त्यांनी कायद्याचा अभ्यास सुरु केला. पण नियतीला काही वेगळेच मंजूर होते.

अचानक चालायला त्रास होऊ लागला व एक दिवस बसची पायरी ही चढता येईना. मग तेथून सुरु झाला दवाखान्याचा प्रवास. सांगली, पुणे, मुंबई, बंगलोर सगळ्या ठिकाणी तज्ञ डॉक्टर झाले. असंख्य चाचण्या व औषधे झाली. सर्व डॉक्टरांनी हा 'मस्क्युलर डिस्ट्रॉफी' आजार असल्याचे निदान केले. म्हणजे आता हळूहळू शरीर क्षीण होणार होते. सुरवातीला त्या खचल्या. पण आई, वडील, भाऊ, मित्र, मैत्रिणींनी आधार दिला व त्यांनी पुनः लढायचे ठरविले. "Don't concentrate on what you don't have, concentrate on what you have" ह्या तत्वावर पुनः जोमाने अभ्यास करत अडचणींवर मात करत २००४ साली एल.एल.बी. चे शिक्षण विद्यापीठात तिसऱ्या क्रमांकाने पूर्ण केले. ह्या सुमारास स्टिफन हॉकिन्स चरित्र वाचण्यात आले. २००६ साली विद्यापीठात द्वितीय क्रमांकाने एल.एल.एम.चे शिक्षण पूर्ण केले.

त्यांच्या ह्या उपलब्धीसाठी शिवाजी विद्यापीठाने त्यांना राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित केले. त्यांचे कायद्याचे ज्ञान व वक्तृत्वशैली ह्या जोरावर त्यांची शिवाजी विद्यापीठात असिस्टंट प्रोफेसर म्हणून नियुक्ती झाली. तसेच त्यांना २००७ साली महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्याकडून राजभवन येथे चान्सलर्स अवॉर्ड देऊन सन्मानित केले.

इकडे त्यांचा आजार बळावत चालला व त्यांना नोकरी सोडावी लागली. त्या इचलकरंजीला परत आल्या. आपल्याला घराबाहेर पडणे शक्य नसले तरी आपण घरी राहून अध्यापन आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा त्यांनी निश्चय केला आणि 'ओम लॉ कोचिंग क्लासेस' सुरु केले. तसेच कंपनी सेक्रेटरी, सी.ए. तसेच जजच्या परीक्षेचे पण त्या क्लासेस घेतात.

आता त्यांचा आजार वाढल्याने त्यांना पुस्तके व पेनही हातात धरता येत नाही. तरीही विश्वास बरणार नाही एवढ्या जिद्दीने त्या आपल्या विद्यार्थ्यांचे भविष्य घडवित आहेत. 'माझे चार विद्यार्थी न्यायाधीश झालेत' असे त्या अभिमानाने सांगतात.

तसेच जवळपास ३०-४० विद्यार्थी उत्तम वकील म्हणून वेगवेगळ्या न्यायालयात काम करीत आहेत. विद्यार्थी सांगतात की आजपर्यंतचा सर्वात चांगला शिक्षक आम्हाला इथे आल्यावर भेटला. कायद्याच्या पाच वर्षाच्या कोर्समधे असलेले सर्व विषय त्या तन्मयतेने शिकवतात. तसेच सध्या कायद्यांच्या सर्व विषयांच्या नोट्स त्यांना प्रकाशित करायच्या आहेत व त्यावर त्यांचे काम सुरु आहे. शरीराने साथ सोडली तरीही त्या हरल्या नाहीत.

अशी मोठी स्वप्ने बाळगणाऱ्या एवढी मेहनत घेणाऱ्या व सतत हसतमुख असणाऱ्या उंच भरारी घेणाऱ्या ॲड. प्रीति पटवांच्या जिद्दीला सलाम !

**- डॉ. जयश्री पंढरपूरकर**

# आशादीप केंद्राचे उपक्रम

## आशादीप दिव्यांग पुनर्वसन केंद्र

- आर्थिक मदत : साधने, व्यावसायिक प्रशिक्षण, वाहन, भोजन, निवास खर्च इ.
- स्व. पद्मजा डोंगरे स्मृती शैक्षणिक सुविधा केंद्र : ऑडिओ बुक लायब्ररी, वाचन कट्टा, लेखनिक प्रकल्प
- व्यक्तिमत्व विकास केंद्र : व्यक्तिमत्व व कौशल्य विकास, प्रेरक व्याख्याने, स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन
- प्रोत्साहन व प्रेरणा : स्व. उषा संत स्मृती पुरस्कार व दिव्यांग गुणवंत सत्कार
- क्रिडा : अंध महिला क्रिकेट चमूचे संघटन
- दिव्यागांसाठी स्टडी सेंटर व नेटकॅफे

## आशादीप आरोग्य व पोषण केंद्र

- दिव्यांग आरोग्य शिबीर
- आहार जागर
- पोषक आहार उत्पादन केंद्र
- आहार सल्ला व मार्गदर्शन

## उद्योग मंदिर

- कागदी व कापडी पिशव्या प्रशिक्षण व विक्री
- पेपर मॅशेच्या वस्तू - प्रशिक्षण व विक्री
- दिव्यांग उत्पादित वस्तूंची विक्री

### आमची उत्पादने : परिवार स्वास्थ्यासाठी

**मिश्र धान्याची बिस्किटे** - मैदा विरहित, मेथी, सोया व नाचणीयुक्त बिस्किटे
**मिश्र धान्याची पिठे** - प्रथिने, लोह व कॅल्शियमयुक्त नवान्न सोजी, नवान्न आटा, थालीपीठ आटा, सुखदा, परिपूर्ण लाडू पीठ, चैतन्य लाडू पीठ
**बहुगुणी नाचणी** - नाचणी सत्व, रागी व्हिटा, रागी सुधा
**सकस, सुरस झटपट तयार** - मधुमेह, स्थूलता, ब्लडप्रेशर इ.व्याधिंसाठी उपयुक्त
**पारंपारिक सात पदार्थांची स्वास्थ्य सप्तक न्याहारी** - पोषक उकरपेंडी मिक्स, हरियाली पराठा मिक्स, सुखदा, चटपटा मिक्स, पोषांबील मिक्स, नवरतन मुठिया मिक्स, पुर्णान्न थालीपीठ मिक्स, सात्विक खीर मिक्स, पास्ता मिक्स
**चटपटीत चटण्या** - सोयायुक्त गोडलिंब चटणी, सोयायुक्त डांगर, हृदयमित्र जवस चटणी, आनंदमित्र अंबाडी चटणी
**नळीतून देण्यासाठी प्रथिनयुक्त पुरवणी** - पोषांकुर, संपूर्ण

# आवाहन

आमची संस्था सामाजिक दायित्वाचा वसा घेऊन दिव्यांग व महिला-बाल सेवा कार्यात आपला खारीचा वाटा उचलण्याचा प्रयत्न करीत आहे. कोणतेही कार्य समाजाच्या शुभेच्छा व सक्रिय पाठिंब्यानेच उभे राहू शकते. याची जाणीव ठेवून आपल्याकडून सहकार्याची अपेक्षा आहे.

## आपण काय करू इच्छिता ?

| | | | |
|---|---|---|---|
| **सभासदत्व -** | आजीव | - | रु. ५००/- |
| | वार्षिक | - | रु. १००/- |
| | स्नेही मंडळ | - | रु. १००/- |

## देणगी

रोख व वस्तुरूपात खालील उपक्रमांसाठी स्वीकारण्यात येते.

- दिव्यांग पुनर्वसन प्रकल्प
- पोषण पुनर्वसन प्रकल्प
- संस्थेचे इतर उपक्रम

अधिक माहितीसाठी आमची वेबसाइट www.ashadeepsanstha.org बघावी.

**रक्कम आयकर ८० जी नुसार करमुक्त राहील.**

## आपण हे करू शकता

- आपल्या परिसरात आहार जागर कार्यक्रमाची आखणी करणे.
- पोषण पुनर्वसन केंद्रातील पदार्थांच्या विक्री करीता मदत करणे.
- संस्थेची माहिती दिव्यांग व्यक्तिपर्यंत पोहचविणे.
- संस्थेच्या कार्यात प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष मदत व कार्यक्रमाला उपस्थिती.

आत्म दीपो भव!
आशादीप
संस्थापिका
स्व. उषाताई संत

# अपंग, महिला-बाल विकास संस्था, नागपूर

स्थापना : ३ जुलै १९९३ • रजि. नं. महा/४१३/९३

आशादीप

प्लॉट नं. १, सिव्हिल लाईन्स, वेस्ट हायकोर्ट रोड, नागपूर-४४० ००१
दूरध्वनी : ०७१२-२५४५४७७ • मो. ९८२३३ ६२१६१
E-mail : pnslit@yahoo.com • Website : www.ashadeepsanstha.org